**बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या लोखंडाच्या असाधारण (abnormal) दरवाढीचे अनुषंगाने कंत्राटदारांना विशेष भाववाढ देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
सार्वजनिक बांधकाम विभाग,
शासन निर्णय क्रमांक - सीएटी ०६/०४/१४८/इमारती २,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १६ मे २००५.

**प्रस्तावना** :- बांधकामासाठी वापरावयाच्या लोखंडाच्या किंमतीत मागील काही महिन्यांत झालेल्या असाधारण (abnormal) भाववाढीमुळे कामे पूर्ण करण्यासाठी बांधकाम कंत्राटदारांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे अशा प्रकारची निवेदने सतत शासनाकडे येत आहेत. घाऊक किंमतीच्या निर्देशांकाप्रमाणे भाववाढीचा फरक मिळूनही कंत्राटदाराने असाधारण (abnormal) दराने बांधकामासाठी वापरलेल्या लोखंडासाठी अदा केलेली किंमत भरुन येत नसल्यामुळे लोखंडासाठी अस्तित्वातील निर्देशांकाप्रमाणे विशेष भाववाढ अदा करणेबाबतचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन होता. याबाबतीत सर्व बाबींचा सांगोपांग विचार करुन शासनाने याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

**शासन निर्णय** :- मागील काही महिन्यांत बांधकामासाठी वापरावयाच्या लोखंडाच्या दरात असाधारण (abnormal) भाववाढ झाल्यामुळे कंत्राटदारांना घाऊक किंमतीच्या निर्देशांकाप्रमाणे भाववाढ अदा करुनही शासकीय कामात वापरलेल्या लोखंडासाठी अदा केलेली किंमत भरुन येत नसल्यामुळे, ज्या कामांमध्ये लोखंडाच्या बाबीचा समावेश आहे, अशा कामांसाठी लोखंडाच्या बाबीसाठी खालीलप्रमाणे विशेष भाववाढ मंजूर करणेत यावी.

२. लोखंडासाठी येणारी विशेष भाववाढ या शासन निर्णयानुसार ठरविणेत यावी. सदरची येणारी विशेष भाववाढ ही मंजूर निविदेतील भावफरक कलमाप्रमाणे (Price Variation Clause) येणा-या भाववाढ /घट पेक्षा अतिरिक्त राहील. **हा सदरचा शासन निर्णय सध्या प्रगतीपथावर असलेल्या तथापि, १ जुलै, २००३ रोजी अस्तित्वातील असणाऱ्या निविदांना तसेच १ जुलै, २००३ पूर्वी प्राप्त झालेल्या परंतु त्यानंतर मंजूर करण्यात आलेल्या निविदांना लागू राहील.**

३. सदरील विशेष भाववाढ ही अस्तित्वातील भाव फरकाच्या अटींच्या व्यतिरिक्त खालील अटींस अधीन राहून मंजूर करण्यात यावी.

अ) कंत्राटदाराच्या चुकीमुळे कामास विलंब झालेला नसावा.

ब) कामाची गुणवत्ता निविदा शर्तीप्रमाणे आहे याची खात्री करण्यात यावी.

क) ज्या निविदांमध्ये भावफरकाच्या कलमासह बांधकामासाठी लागणा-या लोखडांसाठी तारांकीत दर (Star Rate) समाविष्ट केले आहेत, अशा निविदांसाठी सदरील विशेष भाववाढ देय राहणार नाही.

४. बांधकामासाठी लागणा-या लोखंडासाठीचे बाजारभाव विचारात घेवून ज्या निविदांचे अधिक्य मंजूर करण्यात आलेले आहे, अशा प्रगतीपथावरील कामांच्या निविदांसाठी सदरील विशेष दर वाढ देय राहणार नाही. तथापि, काही विशिष्ट प्रकरणी प्रचलीत बाजार भाव विचारात घेवून अधिक्य मंजुर केलेल्या निविदा स्वीकृत झाल्यानंतर लोखंडाच्या भावात असाधारण (abnormal) भाववाढ झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही, अशा प्रकरणी प्रगतीपथावरील कामाच्या प्रगतीवर विपरीत परिणाम होवू नये यासाठी कंत्राटदारांला विशेष भाववाढ देणे आवश्यक आहे, अशी क्षेत्रिय अधिका-यांची खात्री झाली असेल, तर अशा प्रकरणी मुख्य अभियंत्यांनी काळजीपूर्वक तपासणी करून नंतरच विशेष भाववाढ मंजूर करावी.

५. सदरील विशेष भाववाढ ही ज्या निविदांमध्ये भावफरकाचे कलम अंर्तभूत आहे अशा निविदांसाठी तसेच ज्या निविदांमध्ये भावफरकाचे कलम अंर्तभूत नाही, अशा दोन्ही प्रकाराच्या निविदांसाठी देय राहील.

६.(अ). सदरील विशेष भाववाढ ही खालील सूत्राप्रमाणे मंजूर करण्यात यावी.

$$SR = \frac{So \times \text{Avg. of Difference of RBI Indices for steel}}{\text{Avg.of Thereotical RBI. Index for the quarter in which steel is consumed}} \times T$$

Where, SR - Special relief to be given for steel price rise, in Rupees.

So = Basic rate of steel in Rupees per tonne considered while accepting the tender, i.e., DSR rate on which tender is based .

T = Weight of steel in tonne/tonnes used after 1.7.2003., in the corresponding quarter.

(Refer Solved example –A in Annexure)

६(ब) ज्या निविदा १ जुलै २००३ नंतर प्राप्त होऊन, त्यानंतर स्विकृत करण्यांत आल्या आहेत. "अशा निविदांचे बाबतीत वरील परिच्छेद क्र.४ मधील तरतूदींना अधीन राहून", सदर विशेष भाववाढ ही खालील सूत्राप्रमाणे मंजूर करण्यात यावी.

$$SR = \frac{So \times \text{Avg. Difference of RBI Indices for steel}}{\text{Theoretical RBI Index for the month in which last date for receipt of tender falls.}} \times T$$

Where, SR - Special relief to be given for steel price rise, in Rupees.

So = Basic rate of steel in Rupees per tonne considered while accepting the tender, i.e., DSR rate on which tender is based .

T = Weight of steel in tonne/tonnes used after 1.7.2003., in the corresponding quarter.

(Refer Solved example-B in Annexure)

७. वरील ६ (अ) प्रमाणे येणारी विशेष भाववाढ ही अधीक्षक अभियंता स्तरावर मंजुर करण्यात यावी व ६(ब) व परिच्छेद ४ च्या अनुषंगाने येणारी विशेष भाववाढ ही मुख्य अभियंता स्तरावर मंजूर करण्यात यावी.

८. एखाद्या कामासाठी सदरील विशेष भाववाढ मंजूर करतांना संबंधित कामाच्या संदर्भाने क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी/ शासनाने/लवादाने/न्यायालयाने/दावा समितीने इ. नी लोखंडाच्या असधारण (abnormal) भाववाढीच्या अनुषंगाने मंजूर केलेले दावे (Claims) विचारात घेवून संबंधीत कामासाठी अशा दाव्यांपोटी अदा केलेली रक्कम वजा करूनच विशेष भाववाढ मंजूर करावी.

९. लोखंडाच्या असाधारण (abnormal) भाववाढीचे अनुषंगाने त्या तिमाहीत देण्यात येणाऱ्या विशेष भाववाढीचे देयक अदा करण्यापूर्वी कंत्राटदाराकडून उपरोक्त असाधारण (abnormal) भाववाढीच्या अनुषंगाने अंतिम हिशोब चुकता ( full and final settlement) झाल्याबाबतचे लेखी वचन (under taking) घेण्यात यावे.

१०. सदरील विशेष भावफरक ही उभायान्वयी परिणामकारक (operative bothways ) राहील.

११. विशेष भाववाढ अदा केल्यामुळे होणारा जास्तीचा खर्च हा संबंधित कामावर खर्ची टाकण्यात यावा व तो वेगळा दाखविण्यात यावा.

१२. हे आदेश ग्राम विकास विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, गृहनिर्माण विभाग, पाटबंधारे विभाग यांच्या सहमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३०/८/२००४ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

१६/९/२००४

( हि. अ.श्रीमाळ. )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

मा. मुख्यमंत्री ह्यांचे प्रधान सचिव,
मा. मंत्री (सा.बां.)/पाटबंधारे ह्यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री (सा.बां.)/पाटबंधारे ह्यांचे खाजगी सचिव,
मा.मुख्यसचिव कार्यालय
वित्त.विभाग/सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,

महालेखापाल-१, मुंबई/महालेखापाल-२, नागपूर,
सचिव (रस्ते) ह्यांचे स्वीय सहाय्यक, सचिव (बांधकामे) ह्यांचे जेष्ठ स्वीय सहाय्यक,
सार्वजनिक बांधकाम विभाग /पाटबंधारे विभाग, मंत्रालय,
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,

प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी -

सर्व मुख्य अभियंते, सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग,
मुख्य अभियंता, बृहन्मुंबई क्षेत्र विकास प्राधिकरण, मुंबई,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा), मुंबई,
महाराष्ट्र,औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई,
व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ, (सिडको),
निर्मल बिल्डींग, नरीमन पॉइंट, मुंबई/महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,
मुंबई,
पाटबंधारे विकास महामंडळ, कृष्णा/तापी/गोदावरी/विदर्भ,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई,
आयुक्त, सर्व महानगरपालिका (२ प्रतींसह),
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषदा,
अधीक्षक अभियंता व प्रादेशिक अधिकारी, भूपृष्ठ वाहतूक मंत्रालय, मुंबई,
सर्व अधीक्षक अभियंते, सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग,
अधीक्षक अभियंता, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ,वरळी, मुंबई/
संचालक, उपवने आणि उद्याने, मुंबई,
श्री. एस. रामानुजम मुख्य अभियंता, सिव्हील,आर्कीटेक्ट अँड सिव्हील
इंजिनिअरिंग डिव्हीजन,बी.ए.आर.सी. ट्रॉम्बे.मुंबई.४०००८५
प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी,
सर्व कार्यकारी अभियंते, सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग/जिल्हा परिषद,
सर्व अधिकारी/कार्यासन अधिकारी,सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग, मंत्रालय,
कार्यासन इमारती-२, (निवड नस्ती)

# APPENDIX

**(Accompaniment to the Government Resolution regarding Special Relief for Steel to be given due to abnormal rise in the cost of steel)**

**Special Relief for Steel.**

**Note : The all India steel price index as published in the RBI Bulletin has increased from 135.80 in October 2002 to 151.50 in June 2003. The increase in the index of 15.70 has taken place in the short period of 8 months. Therefore, average monthly increase of 1.96 considered for working out theoretical index shown in Column 2 below –**

| Month & Year | Theoretical Index assuming pro-rata increase on the basis of trend of previous years. | Actual Index for the month | Difference in Index (Col.3-2) |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| June 2003 | 151.50 | 151.50 | - |
| July 2003 | 153.46 | 158.90 | +5.44 |
| August 2003 | 155.42 | 176.00 | +20.58 |
| September 2003 | 157.38 | 187.40 | +30.02 |
| October 2003 | 159.34 | 190.70 | +31.36 |
| November 2003 | 161.30 | 190.70 | +29.40 |
| December 2003 | 163.26 | 190.70 | +27.44 |
| January 2004 | 165.22 | 189.70 | +24.48 |
| February 2004 | 167.18 | 189.70 | +22.52 |
| March 2004 | 169.14 | 197.30 | +28.16 |
| April 2004 | 171.10 | 201.60 | +30.50 |
| May 2004 | 173.06 | 202.00 | +28.94 |
| June 2004 | 175.02 | 235.10 | +60.08 |
| July 2004 | 176.98 | 241.00 | +64.02 |
| August 2004 | 178.94 | 237.30 | +58.36 |
| September 2004 | 180.90 | 237.30 | +56.40 |
| October 2004 | 182.86 | 237.30 | +54.44 |
| November 2004 | 184.82 | | |
| December 2004 | 186.78 and so on | | |

❖ The actual indices for Nov. 2004 onwards for steel shall be taken from R.B.I. Bulletin.

## ANNEXURE

## SOLVED EXAMPLES

**Solved example for working out Special Relief for tenders received/accepted before 1.7.2003.**

A) Solved example for working out Special Relief as per para 6(a) of the G.R.

Data :-

Steel consumed in quarter September 2003 to Nov.2003, say 16 tonnes.

So-Basic rate of steel in rupees per tonne considered while calling tender, i.e. DSR rate on which tender is based, say, Rs.17000/ tonne.

Table for steel price indices will be as under.

| Month & Year | Theoretical Index assuming pro-rata increase on the basis of trend of previous years. | Actual Index for the month | Difference in Index (Col.3-2) |
|---|---|---|---|
| Sept.2003 | 157.38 | 187.40 | +30.02 |
| Oct.2003 | 159.34 | 190.70 | +31.36 |
| Nov 2003 | 161.30 | 190.70 | +29.40 |
| Average | 159.34 | 189.60 | +30.26 |

SR = So X Avg. of Difference of Indices XT / Avg.of theoritical RBI Index for the quarter in which steel is consumed (say Sept.2003 to Nov. 2003)

$$= \frac{17000 \times 30.26 \times 16}{159.34}$$

= Rs.51655.05

B) Solved example for working out speical relief as per para 6 (b) of the G.R.

Data :-

Tender is received say in month of January 2004.Steel consumed in quarter February 2004 to April 2004 say 16 tonnes.

So – Basic rate of steel in rupees per tonne considered while accepting the tender i.e. excess approved with respect to market rate.

Say Rs.18000/tonne.

Table for steel price index will be as under.

| Month & Year<br><br>1 | Theoretical Index assuming pro-rata increase on the basis of trend of previous years.<br><br>2 | Actual Index for the month<br><br>3 | Difference in Index (Col.3-2)<br><br>4 |
|---|---|---|---|
| January 2004 | 189.70* | 189.70 | - |
| February 2004 | 191.66** | 189.70 | (-) 1.96 |
| March 2004 | 193.62*** | 197.30 | + 3.68 |
| April 2004 | 195.58 | 197.30 | +1.72 |
| | | | Average (+) 1.15 |

SR= <u>So X Avg. Difference of RBI Indices for steel X T</u>
Theoretical RBI Index for the month in which last date for receipt of tender falls.

$$SR = \frac{18000 \times 1.15}{189.70} \times 16$$

SR = Rs.1745.90

* 189.70 – Actual Index for steel in the month of receipt of the tender
** 189.70 + 1.96♣ = 191.66
*** 191.66 + 1.96♣ = 193.62 ...... and so on

♣ 1.96 is average monthly index from October 2002 to June 2003 considered for working out theoretical index .

------